09 JUL 2026

जनप्रवास

# शिवाजी विद्यापीठात संत गुलाबराव महाराज यांना अभिवादन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत, प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते संत गुलाबराव महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्यानंतर उपस्थितांनीही पुष्प वाहून अभिवादन केले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे संचालक डॉ. सागर डेळेकर, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. सावलीराम घाणे, स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीचे संचालक डॉ. अजित कोळेकर यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

0 9 JUL 2026

तरुण भारत

# पद्मश्री डॉ. वर्मा यांचे आज शिवाजी विद्यापीठात व्याख्यान

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र अधिविभाग व 'इंडियन असोसिएशन ऑफ फिजिक्स टीचर्स" सब रिजनल कौन्सिल ८ डी यांच्या संयुक्त विद्यमाने प्रख्यात भौतिकशास्त्रज्ञ पद्मश्री डॉ. एच. सी. वर्मा (आयआयटी, कानपूर) यांच्या विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. राजर्षी शाहू सभागृहात गुरूवारी दि.९ रोजी सकाळी ११ वाजता व्याख्यानाला प्रारंभ होणार आहे. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. राजनीश कामत असणार आहेत. डॉ. वर्मा यांचे 'कन्सेप्ट्स ऑफ फिजिक्स" हे पुस्तक आयआयटी–जेईई, नीट व इतर स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी महत्वाचे मानले जाते. भौतिकशास्त्रासारखा कठीण विषय अत्यंत सोप्या व रंजक पद्धतीने कसा अभ्यासावा, यावर ते मार्गदर्शन करणार आहेत. सर्व कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयांमधील विद्यार्थी, भौतिकशास्त्राचे प्राध्यापक, शिक्षक आणि विज्ञानप्रेमींनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजक भौतिकशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. राजेंद्र सोनकवडे यांनी केले आहे.

0 9 JUL 2026

तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठात आज हवामान जनजागृती कार्यशाळा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, द इंडियन सोसायटी ऑफ हीटिंग, रेफ्रिजरेटिंग अँड एअर कंडिशनिंग इंजिनियर्स आणि युआन यांच्या संयुक्त विद्यमाने भारत क्लायमेट सत्याग्रह यात्रा अंतर्गत हवामान जनजागृती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. गुरूवारी दि.९ दुपारी २.३० वाजता राजर्षी शाहू सभागृहात ही कार्यशाळा होणार आहे. या कार्यशाळेत सोलर मॅन ऑफ इंडिया, एनर्जी स्वराजचे फाउंडर प्रा. चेतनसिंह सोलंकी मार्गदर्शन करणार आहेत. हवामान बदल, शाश्वत जीवनशैली, ऊर्जा स्वावलंबन व स्वेच्छेने हवामान कृती या विषयांवर मार्गदर्शन करणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. राजनीश कामत असतील. तर प्र–कुलगुरू डॉ. ज्योती जाधव व कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. कार्यशाळेसाठी विद्यार्थी, शिक्षक, संशोधक, अधिकारी, कर्मचारी, पर्यावरणप्रेमींनी उपस्थित राहावे, असे आवाहन स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीचे प्रभारी संचालक डॉ. अजित कोळेकर यांनी केले आहे.

0 9 JUL 2026

जनप्रवास

# विद्यापीठात हवामान जनजागृती कार्यशाळा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, द इंडियन सोसायटी ऑफ हीटिंग, रेफ्रिजरेटिंग अँड एअर कंडिशनिंग इंजिनियर्स (इश्रे) आणि युआन यांच्या संयुक्त विद्यमाने "भारत क्लायमेट सत्याग्रह यात्रा"अंतर्गत येत्या गुरूवारी (दि. ९) दुपारी २.३० वाजता राजर्षी शाहू सभागृहात हवामान जनजागृती कार्यशाळेचे आयोजन केले आहे. या कार्यशाळेसाठी प्रा. चेतन सिंह सोलंकी, सोलर मॅन ऑफ इंडिया तथा फाउंडर, एनर्जी स्वराज हे प्रमुख अतिथी व प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित राहणार आहेत. हवामान बदल, शाश्वत जीवनशैली, ऊर्जा स्वावलंबन आणि स्वेच्छेने हवामान कृती या विषयांवर सोलंकी मार्गदर्शन करणार आहेत. कुलगुरू डॉ. राजनीश कामत अध्यक्षस्थानी असतील. प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव आणि कुलसचिव डॉ. विलास शिंदे प्रमुख उपस्थित असतील. कार्यशाळेसाठी उपस्थित राहावे, असे आवाहन प्रभारी संचालक डॉ. अजित कोळेकर यांनी केले आहे.

0 9 JUL 2026

जनप्रवास

# १० अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मार्च / एप्रिल - २०२६ उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा दि. १ एप्रिलपासून व्यवस्थितपणे सुरु झालेल्या आहेत. मंगळवारी ७ जुलैरोजी विविध ८ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पध्दतीने ५ परीक्षा केंद्रावर सुरळीतपणे पार पडल्या आहेत. मंगळवारी विविध १० अभ्यासक्रमांचे निकाल जाहिर करण्यात आलेले असून आजअखेर ८२६ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर केलेले आहेत.

0 9 JUL 2026
सकाळ

# विविध २७ अभ्यासक्रमांसाठी दुसऱ्यांदा प्रवेश परीक्षा

## १६ पर्यंत मुदत ; स्पर्धा परीक्षा केंद्रासाठी आवाहन

कोल्हापूर, ता. ८ : विविध २७ अभ्यासक्रमांच्या रिक्त जागांवरील प्रवेशासाठी शिवाजी विद्यापीठाकडून २१ जुलै रोजी दुसऱ्यांदा पुनर्प्रवेश परीक्षा घेतली जाणार आहे. त्यासाठी अर्ज करण्याची प्रक्रिया गुरुवारपासून (ता. ९) सुरू होणार आहे.

अधिविभाग आणि पी. जी. सेंटरमधील विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी मे महिन्यात पहिल्यांदा प्रवेश परीक्षा घेतली. त्यामध्ये अभ्यासक्रमांच्या एकूण प्रवेश क्षमतेच्या तुलनेत अपेक्षित प्रमाणात विद्यार्थी प्रवेशित झाले नाहीत. त्यावर गेल्या महिन्यात विद्यापीठाने पुनर्प्रवेश परीक्षा घेतली. त्यासाठी एकूण ८१८ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी ७१३ जणांनी परीक्षा दिली, तर १०५ विद्यार्थी गैरहजर राहिले. या फेरीनंतर अधिकत्तर अभ्यासक्रमांच्या जागा रिक्त राहिल्या आहेत. यासाठी विद्यापीठाकडून दुसऱ्यांदा पुनर्प्रवेश परीक्षा होणार आहे. त्यासाठी अर्ज करण्याची मुदत १६ जुलैपर्यंत आहे. विद्यार्थ्यांना एकाच अभ्याक्रमाची प्रवेश परीक्षा देता येणार आहे. विद्यापीठात प्रवेशित होणाऱ्या सीमाभागातील विद्यार्थ्यांना विशेष सवलत आहे.

स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राची प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. प्रवेश परीक्षा अर्ज ३० जूनपर्यंत मागविले होते. ज्या विद्यार्थ्यांनी प्रवेश परीक्षा अर्ज केले आहेत, त्याची प्रवेश परीक्षा १५ जुलै रोजी दुपारी चार वाजता मानव्यशास्त्र इमारत येथे घेण्यात येणार असल्याची माहिती समन्वयक डॉ. कविता वड्राळे यांनी दिली.

**0 9 JUL 2026**

**सकाळ**

Estd.1962
"A++" *Accredited by* NAAC (2021) with CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

## द्वितीय पुनःप्रवेश प्रक्रिया सूचना

## विविध अभ्यासक्रमांच्या रिक्त जागांसाठी

सन २०२६–२०२७ या शैक्षणिक वर्षात विद्यापीठ अधिविभाग/संलग्न महाविद्यालयांकडील खाली नमूद करण्यात आलेल्या अभ्यासक्रमांच्या रिक्त जागांसाठी **द्वितीय पुनःप्रवेश परीक्षा दि. २१/०७/२०२६ रोजी तंत्रज्ञान अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर** येथे आयोजित करण्यात आलेली आहे. सदर प्रवेश परीक्षेसाठी **दि.०९/०७/२०२६ ते दि. १६/०७/२०२६ या कालावधीत** विद्यार्थ्यांनी ऑनलाईन प्रवेश परीक्षा अर्ज भरावेत.

**विशेष सूचनाः– विद्यार्थ्यांना फक्त एकाच अभ्यासक्रमाची प्रवेश परीक्षा देणे अनिवार्य आहे.**

| Sr. No | Name of the Subject | Sr. No. | Name of the Subject |
|---|---|---|---|
| 1 | M.Sc. Physics | 15 | MA Travel & Tourism |
| 2 | M.Sc. Chemistry (Industrial/ Applied/ Inorganic/ Organic/ Physical/Analytical) | 16 | M.Sc. Mathematics/ M.Sc. (Mathematics With Computer Application) |
| 3 | M.Sc. Botany | 17 | MSW (YCSRD) |
| 4 | M.Sc. Zoology | 18 | M.B.A. Rural Management (YCSRD) |
| 5 | M.Sc. Nano Science & Technology | 19 | M.Tech. (Rural Technology) YCSRD |
| 6 | M.Sc. Statistics (Only College) | 20 | M.A. Mass Communication |
| 7 | M.Sc. Electronics | 21 | M.Sc. Food Science & Technology |
| 8 | M.Sc. Biochemistry/ Biotechnology | 22 | M.A. Russian |
| 9 | M.SC. Microbiology/ M.Sc. Pharmaceutical Microbiology | 23 | Bachelor of Journalism |
| 10 | M.Sc. Environmental Science | 24 | Master of Journalism |
| 11 | M.Sc. Agro Chemical & Pest Management | 25 | M.Sc. Geoinformatics |
| 12 | M.Sc. Computer Science | 26 | Medical Information management |
| 13 | M.A. Yogshastra | 27 | **M.C.A.** (only for B.C.A. Students from Department of Computer Science Shivaji University, Kolhapur.) |
| 14 | M.A./M.Sc. Geography | | |

**शिवाजी विद्यापीठात प्रवेश घेण्याऱ्या सीमा भागातील विद्यार्थ्यांना विशेष सवलत देण्यात येत आहे.**

**यापुढे पुनःश्च प्रवेश प्रक्रिया होणार नाही याची संबंधितांनी नोंद घ्यावी.**

इच्छुक विद्यार्थ्यांनी पुनःप्रवेश परीक्षेच्या अधिक माहितीसाठी व रिक्त जागांच्या तपशीलाकरिता खालील विद्यापीठाच्या संकेतस्थळावर भेट देण्यात यावी. www.unishivaji.ac.in/mscadmission/For-Student-Information व पदव्युत्तर प्रवेश विभागाकडील दूरध्वनी क्रमांक ०२३१–२६०९१४२/९४४९/९४८८ यावर संपर्क साधावा.

**ठिकाण:** कोल्हापूर.
**दिनांक :** ०९/०७/२०२६

**डॉ. व्ही. एन. शिंदे**
कुलसचिव

0 9 JUL 2026

पुढारी

Estd.1962
"A++" Accredited by
NAAC (2021) with
CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
## द्वितीय पुन:प्रवेश प्रक्रिया सूचना
## विविध अभ्यासक्रमांच्या
## रिक्त जागांसाठी

सन २०२६–२०२७ या शैक्षणिक वर्षात विद्यापीठ अधिविभाग/संलग्न महाविद्यालयांकडील खाली नमूद करण्यात आलेल्या अभ्यासक्रमांच्या रिक्त जागांसाठी **द्वितीय पुन:प्रवेश परीक्षा दि. २१/०७/२०२६ रोजी तंत्रज्ञान अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर** येथे आयोजित करण्यात आलेली आहे. सदर प्रवेश परीक्षेसाठी **दि.०९/०७/२०२६ ते दि. १६/०७/२०२६ या कालावधीत** विद्यार्थ्यांनी ऑनलाईन प्रवेश परीक्षा अर्ज भरावेत.

**विशेष सूचना:– विद्यार्थ्यांना फक्त एकाच अभ्यासक्रमाची प्रवेश परीक्षा देणे अनिवार्य आहे.**

| Sr. No | Name of the Subject | Sr. No. | Name of the Subject |
|---|---|---|---|
| 1 | M.Sc. Physics | 15 | MA Travel & Tourism |
| 2 | M.Sc. Chemistry (Industrial/ Applied/ Inorganic/ Organic/ Physical/Analytical) | 16 | M.Sc. Mathematics/ M.Sc. (Mathematics With Computer Application) |
| 3 | M.Sc. Botany | 17 | MSW (YCSRD) |
| 4 | M.Sc. Zoology | 18 | M.B.A. Rural Management (YCSRD) |
| 5 | M.Sc. Nano Science & Technology | 19 | M.Tech. (Rural Technology) YCSRD |
| 6 | M.Sc. Statistics (Only College) | 20 | M.A. Mass Communication |
| 7 | M.Sc. Electronics | 21 | M.Sc. Food Science & Technology |
| 8 | M.Sc. Biochemistry/ Biotechnology | 22 | M.A. Russian |
| 9 | M.SC. Microbiology/ M.Sc. Pharmaceutical Microbiology | 23 | Bachelor of Journalism |
| 10 | M.Sc. Environmental Science | 24 | Master of Journalism |
| 11 | M.Sc. Agro Chemical & Pest Management | 25 | M.Sc. Geoinformatics |
| 12 | M.Sc. Computer Science | 26 | Medical Information management |
| 13 | M.A. Yogshastra | 27 | **M.C.A.** (only for B.C.A. Students from Department of Computer Science Shivaji University, Kolhapur.) |
| 14 | M.A./M.Sc. Geography | | |

**शिवाजी विद्यापीठात प्रवेश घेण्याऱ्या सीमा भागातील विद्यार्थ्यांना विशेष सवलत देण्यात येत आहे.**

**यापुढे पुन:श्च प्रवेश प्रक्रिया होणार नाही याची संबंधितांनी नोंद घ्यावी.**

इच्छुक विद्यार्थ्यांनी पुन:प्रवेश परीक्षेच्या अधिक माहितीसाठी व रिक्त जागांच्या तपशीलाकरिता खालील विद्यापीठाच्या संकेतस्थळावर भेट देण्यात यावी. www.unishivaji.ac.in/mscadmission/For-Student-Information व पदव्युत्तर प्रवेश विभागाकडील दूरध्वनी क्रमांक ०२३१–२६०९१४२/९४४९/९४८८ यावर संपर्क साधावा.

**ठिकाण:** कोल्हापूर.
**दिनांक :** ०९/०७/२०२६

**डॉ. व्ही. एन. शिंदे**
कुलसचिव

0 9 JUL 2026

पुण्यनगरी

Estd.1962
"A++" *Accredited by*
NAAC (2021) with
CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

## द्वितीय पुन:र्प्रवेश प्रक्रिया सूचना

## विविध अभ्यासक्रमांच्या रिक्त जागांसाठी

सन २०२६–२०२७ या शैक्षणिक वर्षात विद्यापीठ अधिविभाग/संलग्न महाविद्यालयांकडील खाली नमूद करण्यात आलेल्या अभ्यासक्रमांच्या रिक्त जागांसाठी **द्वितीय पुन:र्प्रवेश परीक्षा दि. २१/०७/२०२६ रोजी तंत्रज्ञान अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर** येथे आयोजित करण्यात आलेली आहे. सदर प्रवेश परीक्षेसाठी **दि.०९/०७/२०२६ ते दि. १६/०७/२०२६ या कालावधीत** विद्यार्थ्यांनी ऑनलाईन प्रवेश परीक्षा अर्ज भरावेत.

**विशेष सूचना:– विद्यार्थ्यांना फक्त एकाच अभ्यासक्रमाची प्रवेश परीक्षा देणे अनिवार्य आहे.**

| Sr. No | Name of the Subject | Sr. No. | Name of the Subject |
|---|---|---|---|
| 1 | M.Sc. Physics | 15 | MA Travel & Tourism |
| 2 | M.Sc. Chemistry (Industrial/ Applied/ Inorganic/ Organic/ Physical/Analytical) | 16 | M.Sc. Mathematics/ M.Sc. (Mathematics With Computer Application) |
| 3 | M.Sc. Botany | 17 | MSW (YCSRD) |
| 4 | M.Sc. Zoology | 18 | M.B.A. Rural Management (YCSRD) |
| 5 | M.Sc. Nano Science & Technology | 19 | M.Tech. (Rural Technology) YCSRD |
| 6 | M.Sc. Statistics (Only College) | 20 | M.A. Mass Communication |
| 7 | M.Sc. Electronics | 21 | M.Sc. Food Science & Technology |
| 8 | M.Sc. Biochemistry/ Biotechnology | 22 | M.A. Russian |
| 9 | M.SC. Microbiology/ M.Sc. Pharmaceutical Microbiology | 23 | Bachelor of Journalism |
| 10 | M.Sc. Environmental Science | 24 | Master of Journalism |
| 11 | M.Sc. Agro Chemical & Pest Management | 25 | M.Sc. Geoinformatics |
| 12 | M.Sc. Computer Science | 26 | Medical Information management |
| 13 | M.A. Yogshastra | 27 | **M.C.A.** (only for B.C.A. Students from Department of Computer Science Shivaji University, Kolhapur.) |
| 14 | M.A./M.Sc. Geography | | |

**शिवाजी विद्यापीठात प्रवेश घेण्याऱ्या सीमा भागातील विद्यार्थ्यांना विशेष सवलत देण्यात येत आहे.**

**यापुढे पुन:श्च प्रवेश प्रक्रिया होणार नाही याची संबंधितांनी नोंद घ्यावी.**

इच्छुक विद्यार्थ्यांनी पुन:र्प्रवेश परीक्षेच्या अधिक माहितीसाठी व रिक्त जागांच्या तपशीलाकरिता खालील विद्यापीठाच्या संकेतस्थळावर भेट देण्यात यावी. www.unishivaji.ac.in/mscadmission/For-Student-Information व पदव्युत्तर प्रवेश विभागाकडील दूरध्वनी क्रमांक ०२३१–२६०९१४२/९४४९/९४८८ यावर संपर्क साधावा.

**ठिकाण:** कोल्हापूर.
**दिनांक :** ०९/०७/२०२६

डॉ. व्ही. एन. शिंदे
कुलसचिव